# बेस्ट कंपलायन्स विजेता पुरस्काराने धुळ्यातील डॉ.पा.रा.घोगरे विज्ञान महाविद्यालय सन्मानित.

● बाळकडू : सतिष पवार
संपर्क. ९५२७७९९३०४

०६ धुळे ग्रामीण (धुळे): बेस्ट कंपलायन्स रनरअप पुरस्काराने समन्वयक डॉ. स्वाती बोरसे सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थी संघ दिव्या बच्छाव व पूर्वा बोरसे यांना सन्मानित करण्यात आले.दिनांक. १० फेब्रुवारी २०२४ रोजी पुणे येथे क्विक हिल फाउंडेशन मार्फत ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड २०२४'' हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, उत्कृष्ट समन्वयक पुरस्कार तसेच उत्कृष्ट संघ पुरस्काराने श्री. शि .वि.संस्थेच्या डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयाला सन्मानित करण्यात आले.सायबर हल्ला ही आता एक आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्या बनली आहे. सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्रातील ३० महाविद्यालयांची निवड केली गेली. त्यामध्ये डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयाला कबचौ उमवी परीक्षेत्रातून निवड करण्यात आली. क्विक हील फाउंडेशन पुणे यांनी या महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागासोबत सामंजस्य करार केला. त्या संदर्भात क्विक हील फाउंडेशनच्या सीएसआर एक्झिक्यूटिव्ह सुगंधा दाणी यांनी सायबर सुरक्षेविषयी एक दिवसीय कार्यशाळा घेतली व गायत्री पवार यांनी २० विद्यार्थ्यांची अनुक्रमे जयेश गोरे, गणेश पाटील, श्रेया विसपुते, श्रुती विसपुते, दिव्या बच्छाव, पूर्वा पंचारिया, डिंपल चव्हाण, जानव्ही वाणी, हर्षल सोनार, दिवेश सोनार, हर्षदा पाटील, लिमया पाटील , स्नेहल शिनकर, सृष्टी जडे, संजना देसले ,जया देसले , जानव्ही वाघ, साक्षी देवरे , साक्षी पंचारिया व वैभव पाटील यांची सायबर योद्धा म्हणून निवड केली. त्यांना ''सायबर सुरक्षा व जागरूकता'' या विषयावर ''कमवा व शिकवा'' या योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले. समन्वयक डॉ. स्वाती बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली हे सायबर योद्धे धुळे व जळगाव जिल्ह्यातील ३० शाळा व महाविद्यालयात पोहोचले. तेथे त्यांनी व्याख्याने, प्रेझेंटेशन, पथनाट्य, नाटिका या माध्यमातून ऑनलाइन फ्रॉड , गेमिंगद्वारे आपला पैसा व स्वतःच्या महत्वाची माहिती कशी चोरी होते व आपण कसे सुरक्षित राहू शकतो यावर १३२११ विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचून मार्गदर्शन केले . याव्यतिरिक्त सायबर सुरक्षा जनजागृती करण्यासाठी



हे विद्यार्थी विविध गणपती मंडळ, प्रायव्हेट क्लास, ज्येष्ठ नागरिक संघ, शासकीय कार्यालय, विविध मंदिरातील लोकांपर्यंत पोहोचले. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी एकाच वेळी ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसमोर तीन नाटिका सादर करून सायबर गुन्हे विषयी जागृती केली.या कामाची दखल घेऊन क्विक हील फाउंडेशनने ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड २०२४'' यासाठी विद्यार्थी दिव्या बच्छाव , पूर्वा पंचारिया, डिंपल चव्हाण जानवी वाणी , स्वाती बोरसे व डॉक्टर पारा घोगरे विज्ञान महाविद्यालय यांचे नामांकन केले. त्यापैकी १० फेब्रुवारी २०२४ रोजी बेस्ट कंपलायन्स रनरअप अवॉर्ड विद्यार्थ्यांमधून दिव्या बच्छाव व पूर्वा पंचारिया या संघाला, शिक्षकांमधून समन्वयक डॉक्टर स्वाती बोरसे यांना व बेस्ट प्रोसेस कंपलायन्स विनर अवॉर्ड डॉक्टर पा.रा .घोगरे विज्ञान महाविद्यालयाला देऊन सन्मानित करण्यात आले.क्विक हिल फाऊंडेशनचे एमडी व फाऊंडर श्री. कैलाश काटकर व चेअरपर्सन अनुपमा काटकर यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम व्ही पाटील, समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे तसेच विद्यार्थी दिव्या बच्छाव ,पूर्वा पंचारिया, डिंपल चव्हाण व जानवी वाणी यांनी स्वीकारला. यावेळी क्लिक हील फाउंडेशनचे एम.डी.संजय काटकर, महाराष्ट्र सायबर सेल चे एस.पी. संजय शिंत्रे,प्रो. व्ही एल माहेश्वरी, व्हीसी, केबीसीएनएमयू जळगाव, प्रोफेसर प्रकाश महानवार, व्हीसी पीएएच सोलापूर युनिव्हर्सिटी व इतर मान्यवर उपस्थित होते.उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एम व्ही पाटील, उपप्राचार्य प्राध्यापक के. एम .बोरसे, कुलसचिव श्री मुकेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.संस्थेचे चेअरमन माननीय बाबासाहेब कुणाल पाटील ,माननीय बापूसाहेब एसटी पाटील यांनी कौतुक केले आहे.